# श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई

दि. १८ फेब्रुवारी, २०१७

**इच्छूक एजन्सी/व्यक्तींकडून अभिव्यक्ती स्वारस्य (Expression of Interest) मागविण्याबाबत.**

**विषय :— न्यासाच्या विविध कामांसाठी ई—निविदा प्रक्रिया राबविण्यासाठी आवश्यक असलेली कागदपत्रे तयार करण्यासाठी बिडींग डॉक्युमेंन्ट कन्सल्टंट म्हणून नियुक्ती करण्यासाठी इच्छूक एजन्सी/व्यक्तींकडून अभिव्यक्ती स्वारस्य (Expression of Interest) मागविण्याबाबत.**

न्यास व्यवस्थापन समितीच्या दि. १७ जाने, २०१७ च्या बैठकीतील निणर्यानुसार न्यासाकडून करण्यात येणाऱ्या खरेदीसाठी शासनाने विहित केलेल्या सुधारित कार्यपध्दतीनुसार ई—निविदा प्रक्रियेचा अवलंब करण्याच्यादृष्टीने खालील नमूद कागदपत्रे तयार करण्याकरिता शासकीय कार्यालयीन खरेदीच्या ई—निविदा प्रक्रियेचा पूर्वानुभव असलेल्या नामांकित एजन्सी/व्यक्तींकडून अभिव्यक्ती स्वारस्य (Expression of Interest) मागविण्याचे प्रस्तावित आहे.

१) शासकीय विभागाने करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी शासनाने विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार ई—निविदा प्रक्रियेची कागदपत्रे तयार करणे.

२) वृत्तपत्रामधे द्यावयाच्या जाहिरातीचा मसूदा तयार करणे.

३) ई—निविदा सदंर्भात पुरवठादारांकडून उपस्थित करण्यात आलेल्या प्रश्नांचे निराकरण करणे. तसेच त्यांनी प्रस्तावित केलेल्या सुधारणांबाबत आवश्यकतेनुसार सुधारणा कार्यान्वित करून त्या प्रसिध्द करणे.

४) प्रिबिड मिटींगला उपस्थित राहून पुरवठादारांनी प्रस्तावित केलेल्या सुधारणांबाबत न्यासास मार्गदर्शन करणे.

५) तांत्रिक तसेच वाणिज्य लिफाफा उघडण्याच्यावेळी उपस्थित राहून न्यासास मार्गदर्शन करणे, इत्यादि कामे.

**अटी व शर्ती :—**

अ) सिलबंद लखोटयावर ठळक अक्षरात बिडींग डॉक्युमेंन्ट कन्सल्टंट म्हणून नियुक्तीचा देकार असे स्पष्टपणे नमूद करावे.

ब) इच्छुक व्यक्ती/एजन्सी यांनी आपली वैयक्तीक माहिती, अनुभवाचे प्रमाणपत्र व या कामासाठीचा देकार सिलबंद लिफाफ्यात **दि. २५/०२/२०१७ रोजी दुपारी ०२.०० वाजेपर्यंत** न्यासाच्या तिसऱ्या मजल्यावरील नोंदणी शाखेत सादर करावीत.

क) सिलबंद लिफाफे **दि. २५ फेब्रुवारी, २०१७ रोजी दुपारी ०३.०० वाजता** उघडण्यात येतील.

( संजीव पाटील )
**कार्यकारी अधिकारी**